प्राथमिक शिक्षक संवर्गातील कर्मचाऱ्यांना विस्तार अधिकारी (शिक्षण) श्रेणी-2 वर्ग-3 (मराठी माध्यम) या पदावर ज्येष्ठतेने पदोन्नती देणे बाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
प्राथमिक शिक्षण विभाग
आदेश जा.क्र.कार्या-1/पीई-5/ 179/2025
अहिल्यानगर दि. 16/06/2025.

**वाचा :-** 1. ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील दिनांक 10 जुन 2014 ची अधिसुचना
2. महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम दिनांक 01/03/2019.
3. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रं.-एसआरव्ही-2018/प्र.क्र.59/का-12 दि.01/08/2019.
4. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.बीसीसी-2018/प्र.क्र.366/16-ब दि.07/05/2021.
5. महाराष्ट्र शासन सामान्य् प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक दिव्यांग/2022/प्र.क्र.83/16-अ मंत्रालय, मुंबई दि.20 एप्रिल, 2023.
6. पदोन्नती निवड समिती इतिवृत्त दि.24/03/2025.
7. समुपदेशन प्रक्रिया दिनांक 13/06/2025

**::: आदेश :::**

ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील दिनांक 10 जुन 2014 रोजीचे अधिसुचनेतील तरतुदीनुसार शिक्षक (गट-क) या संवर्गातील पदवी व बी.एड अर्हताधारक कर्मचाऱ्यांना सेवाजेष्ठतेच्या आधारे विस्तार अधिकारी श्रेणी-2 वर्ग-3 मराठी माध्यम या पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात खालील अटींच्या अधिन राहुन वेतनस्तर व मॅट्रीक्स एस-15 (41800-132300) या वेतनश्रेणीमध्ये रकाना क्रमांक ६ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी पदस्थापना देण्यात येत आहे. सदर पदोन्नतीने दिलेली पदस्थापना ही संदर्भ क्रमांक 4 मध्ये दिलेल्या सुचनेप्रमाणे मा.सर्वोच्च न्यायालयात राज्य शासनाने विशेष अनुमती याचिका क्र.28306/2017 वरील अंतिम निर्णयाच्या अधिन राहुन पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार भरण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | पद | शाळा/ केंद्र | तालुका | निवड प्रवर्ग | पदोन्नतीने दिलेले बीट/कार्यालय | तालुका |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | 6 | |
| 1 | भुजबळ नलिनी रोहीदास | मुख्याध्यापक | निमगाव वाघा | अहिल्यानगर | जेष्ठतेने निवड | जि.प.शिक्षण (माध्यमिक) विभाग अहिल्यानगर | अहिल्यानगर |
| 2 | फुंदे हनुमंत किसन | मुख्याध्यापक | मुळा कारखाना | नेवासा | जेष्ठतेने निवड | कोल्हार खु | राहुरी |
| 3 | बडे उध्दव तुकाराम | मुख्याध्यापक | भिलवडे | पाथर्डी | जेष्ठतेने निवड | भातकुडगाव | शेवगाव |
| 4 | केदार मिरांबाई भाऊराव | केंद्रप्रमुख | | शेवगाव | जेष्ठतेने निवड | कुकाणा | नेवासा |
| 5 | आंधळे अशोक प्रभाकर | पदवीधर शिक्षक | शेकटे | पाथर्डी | जेष्ठतेने निवड | खर्डा | जामखेड |

| अ. क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | पद | शाळा/ केंद्र | तालुका | निवड प्रवर्ग | पदोन्नतीने दिलेले बीट/कार्यालय | तालुका |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | 6 | |
| 6 | गवळी चांगदेव महादु | मुख्याध्यापक | कोहकडी | पारनेर | जेष्ठतेने निवड | भाळवणी | पारनेर |
| 7 | धामणे पोपट भिकाजी | मुख्याध्यापक | निंबळक | अहिल्यानगर | प्रतिक्षा सुचीतील निवड | जि.प.शिक्षण (प्राथमिक)विभाग अहिल्यानगर | अहिल्यानगर |
| 8 | दरंदले सुनिल दिनकर | मुख्याध्यापक | निंभारी | नेवासा | प्रतिक्षा सुचीतील निवड | पढेगाव | श्रीरामपुर |
| 9 | वलवे नंदा शंकर | पदवीधर शिक्षक | वडगाव लांडगा | संगमनेर | प्रतिक्षा सुचीतील निवड | धांदरफळ | संगमनेर |

**अटी व शर्ती :-**

1. सदरची पदोन्नती ही मा.सर्वोच्च न्यायालयात राज्य शासनाने दाखल केलेली विशेष अनुमती याचिका क्र.28306/2017 च्या न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात दिलेली आहे.
2. सदर पदोन्नती ही तात्पुरत्या स्वरुपात असल्यामुळे पदोन्नतीमुळे जेष्ठतेचा हक्क प्राप्त होणार नाही.
3. पदोन्नतीने नेमणुकीचे ठिकाणी विहित करुन दिलेल्या कालावधीत हजर न झाल्यास तसेच पदोन्नतीने नेमणुकीच्या पदस्थापनेत बदल करणे साठी दबाव आणल्यास महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम 1964 मधील नियम 4 नुसार कारवाई करण्यात येईल.
4. संबंधीत कार्यालय प्रमुखांनी पदोन्नतीने निवड केलेल्या कर्मचाऱ्यास नियुक्तीचे ठिकाणी हजर होणेसाठी पर्यायी व्यवस्था करुन तात्काळ कार्यमुक्त करावे. तसेच कार्यालयाची निकड विचारात घेऊन पदोन्नती देण्यात आलेली असल्याने सात दिवसांचे आत पदोन्नतीचे ठिकाणी हजर व्हावे. अन्यथा सेवाज्येष्ठता डावलली जाईल.
5. सदर पदोन्नतीची नोंद संबंधित कर्मचाऱ्यांचे मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी.
6. पदोन्नतीने हजर झालेल्या कर्मचाऱ्याने पदोन्नतीचे अनुषंगाने वेतननिश्चिती करिता 1 महिन्याचे आत विकल्प देणे बंधनकारक राहील.

सदर आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेला असून त्याचा संकेतांक क्रमांक 202506161600054 असा आहे.

आनंद भंडारी (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

**प्रति,**

श्री./श्रीम.------------------ (उपरोक्त यादीतील अ.क्र.1 ते 9 मधील उपाध्यापक,मुख्याध्यापक,पदवीधर, केंद्रप्रमुख) यांना अनुपालनास्तव,

व्दारा - गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती, . . . . . . . . . . .

2/- सदर आदेशाची प्रत संबंधित कर्मचारी यांना बजावून दिनांकीत स्वाक्षरी घेणेत यावी. तसेच पदोन्नती झालेल्या कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीचे पदस्थापनेचे ठिकाणी हजर होणेसाठी पर्यायी व्यवस्था करुन तात्काळ कार्यमुक्त करुन व हजर झालेले कर्मचारी यांचा अहवाल इकडेस सादर करण्याची दक्षता घ्यावी.

**प्रत** :- गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती ---------------------

**प्रत** :- कार्या-2,आस्था-2 शिक्षण विभाग जिल्हा परिषद,अहिल्यानगर

**प्रत** :- शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद अहिल्यानगर

स्वाक्षरी /-
आनंद भंडारी (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर